


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १८०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१० फेब्रुवारी २०२५

## थोडक्यात

### प्राचार्याविरुद्ध बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, अहिल्यानगर :** एका शालेय विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपावरून शहराच्या उपनगरात असलेल्या एका महाविद्यालयाच्या प्राचार्याविरुद्ध कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. संतोष सुधाकर देवरे (रा. तिसरा मजला, आदित्य कॉम्प्लेक्स, ओयसिस शाळेसमोर, उदयनराजेनगर, केडगाव, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या प्राचार्याचे नाव आहे. गुन्हा दाखल होताच तो फरार झाला आहे.

कोतवाली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार प्राचार्य देवरे हा ९ वर्षीय पीडित मुलाला वेळोवेळी अभ्यासासाठी स्वतःच्या घरी बोलवायचा. अभ्यासाच्या नावाखाली मुलाचा लैंगिक छळ करायचा. हा प्रकार २४ जानेवारीपासून सुरू होता. याबाबत कोणाला काही सांगितले तर आई-वडिलांना मारून टाकू, अशी धमकी त्याने या शालेय विद्यार्थ्याला दिली होती. घाबरलेल्या पीडित मुलाने घरी पालकांना याबद्दल काल, शनिवारी माहिती दिली. विद्यार्थ्याच्या पालकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेतली. पीडित मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होताच प्राचार्य देवरे फरार झाला आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे अधिक तपास करत आहेत.

### चोंभूत मधील बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या पश्चिम भागातील चोंभूत मधील माळी वस्ती परिसरात धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर वनविभागाने शेळके वस्तीत शेतात लावलेल्या पिंजऱ्यात शनिवारी रात्री ९:३० वाजता जेरबंद झाला आहे. दरम्यान, वनविभागाने बिबट्याची रवानगी बिबट प्रवण क्षेत्रात केली जाणार आहे. तालुक्यातील चोंभूत जवळील माळी वस्ती परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून तीन - चार बिबटे संचार करीत असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्यांना तातडीने जेरबंद करावे, अशी मागणी महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष मच्छिंद्र माळी यांनी वनविभागाकडे केली होती. त्या पार्श्वभूमीवर वनविभागाने माळी वस्ती जवळील शेळके वस्तीत शेतात दुसरा पिंजरा लावण्यात आला होता. शनिवार रात्री बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याचे तेथील स्थानिक लोकांनी पाहिले. त्यांनी ही माहिती वनविभागाला दिली. चोंभूतचे वनविभागाचे कर्मचारी हरीभाऊ आठरे व उमेश खराडे घटनास्थळी दाखल झाले. जेरबंद बिबट्याला ताब्यत घेतले असल्याचे त्यांनी सांगितले.

**नागरिकांची दाटली गर्दी !**

रात्री बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याची बातमी चोंभूत परिसरात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी बिबट्या बघण्यासाठी घटनास्थळी धाव घेऊन गर्दी दाटली होती. परिसरातील नागरिकांनी वनविभागाच्या अथक परिश्रम घेतल्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

# अहिल्यानगर महापालिकेने थकवले तब्बल ४५० कोटी रुपये !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, अहिल्यानगर :** अहिल्यानगरः आर्थिकदृष्ट्या डबघाईला आलेल्या अहिल्यानगर महापालिकेने महावितरण, स्वतःच्या कर्मचाऱ्यांची देणीसह पुरवठादार व ठेकेदारांची देणी असे सुमारे ४४६ कोटी ८० लाख रुपयांची देणी थकवली आहेत. याचा परिणाम विकासकामे रखडण्यावर व नागरी सुविधा पुरवण्यावर होत आहे. या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी ही देणी येत्या दोन वर्षात देण्याचा म नपाचा मानस असून त्यासाठी उत्पन्न वाढीबरोबरच वसुलीवर लक्ष देणार असल्याचे सांगितले.




महापालिकेने थकवलेल्या रकमेत पथदिवे व पाणीयोजनेचे चालू विजबिल ११ कोटी रुपये, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची २ कोटी रुपये, शहर बससेवेची तूट १ कोटी, कचरा संकलनाची देयके ३ कोटी, सन १९९० पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे शहर पाणीयोजना असतानाच्या काळातील जुनी थकीत वीजबिले २५० कोटी रुपये, शासकीय योजनांचा स्वहिस्सा १६० कोटी रुपये, कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे ७ कोटी रुपये, पाचवा व सहावा वेतन आयोगाच्या फरकाचे २ कोटी रुपये, निवृत्तीधारकांच्या सातव्या वेतन आयोगाच्या फरकाचे २ कोटी रुपये, निवृत्ती वेतनाच्या अंशदानाचा मनपा हिस्सा ३ कोटी रुपये, अर्जित रजा वेतनाचे १ कोटी रुपये, वैद्यकीय बिलांची ५० लाख, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे १ कोटी रुपये, खतनिर्मिती प्रकल्पाचे १ कोटी रुपये, डिसेंबरच्या वेतनाची १.५ कोटी रुपये, ठेकेदारांची ४० कोटी रुपये, पुरवठादारांची ५ कोटी रुपये, शिक्षण मंडळाच्या वेतनाचा हिस्सा १.२ कोटी रुपये, दिव्यांग म ानधनाचे १ कोटी ६० लाख रुपये व इतर देणी १ कोटी रुपये असे एकूण ४४६ कोटी ८० लाखांचा त्यामध्ये समावेश आहे.

उत्पन्न वाढीसाठी जरी मनपा उपाययोजना करत असली तरी कर वसुली हाच मनपाचा मुख्य उत्पन्नाचा स्रोत असल्याने वसुलीवर भर दिले जात आहे.

थकबाकीदारांना शास्तीमध्ये शंभर टक्के सवलत दिली आहे, त्याचा लाभ घेऊन थकबाकीदारांनी कर भरावा. यापुढे कोणत्याही परिस्थितीत शास्तीमाफी दिली जाणार नाही असेही आयुक्त डांगे यांनी स्पष्ट केले. वसुलीसाठी म हापालिकेने आता जप्तीची कारवाई सुरू केली आहे, याकडे लक्ष वेधत आयुक्तांनी थकबाकीदार मालमत्ता धारकांनी कारवाई टाळण्यासाठी कर भरण्याचे आवाहन केले आहे. मनपाने जरी शास्तीमध्ये शंभर टक्के सवलत लागू केली असली तरी थकबाकीदारांकडून त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही.

# भारताचा इंग्लंडवर सलग सातव्यांदा मालिका विजय, हिटमॅनची फटकेबाजी ठरली प्रभावी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, कटक :** कटकमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला. यासह, टीम इंडियाने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-० अशी अभेद्या आघाडी घेतली आहे. भारतीय संघाच्या विजयाचा सर्वात मोठा हिरो रोहित शर्मा राहिले, ज्याने ९० चेंडूत ११९ धावांची शानदार आणि संस्मरणीय खेळी केली. त्याच्याशिवाय शुबमन गिलनेही अर्धशतकी खेळी करत संघाच्या विजयात मोठे योगदान दिले. त्याचबरोबर रवींद्र जडेजाने ही गोलंदाजीत ३ विकेट्स घेत महत्त्वाची भूमिका बजावली. यासह भारताने सलग सातव्यांदा मालिका विजय नोंदवला.




कटकमधील बाराबती स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या इंग्लंडने बेन डकेट आणि जो रूट यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ४९.५ षटकांत १० गडी गमावून ३०४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, रोहित शर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने ४४.३ षटकांत सहा गडी गमावून ३०८ धावा केल्या आणि सामना जिंकला. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली.रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी १३६ धावांची भागीदारी केली, जी जेमी ओव्हरटनने तोडली.

**विराट कोहली पुन्हा अपयशी**


ओव्हरटनने १७ व्या षटकात युवा फलंदाज गिलला बाद केले. २५ वर्षीय फलंदाज ५२ चेंडूत ६० धावा काढल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावले. गिलने ४५ चेंडूत त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील १५ वे अर्धशतक पूर्ण केले.तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेला विराट कोहली पुन्हा एकदा ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर बाद झाला. आदिल रशीदने त्याला आपला बळी बनवले. तो फक्त पाच धावा करू शकला.

**तिसऱ्या विकेटसाठी हिटमॅनसोबत ७० धावांची भागीदारी**

यानंतर श्रेयस अय्यरने पदभार स्वीकारला. त्याने तिसऱ्या विकेटसाठी हिटमॅनसोबत ७० धावांची भागीदारी केली. यादरम्यान, भारतीय कर्णधाराने ७६ चेंडूत त्याचे ३२ वे शतक पूर्ण केले. तो ९० चेंडूत १२ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ११९ धावांची शानदार खेळी खेळून पॅव्हेलियनम ध्ये परतला. डावाच्या ३० व्या षटकात लियाम लिव्हिंगस्टोनच्या चेंडूवर आदिल रशीदने त्याला झेलबाद केले. इंग्लंडविरुद्ध, श्रेयस अय्यरने ४४, हार्दिक पंड्याने १०, अक्षर पटेलने नाबाद ४१ आणि रवींद्र जडेजाने ११ धावा केल्या. इंग्लंडकडून जेमी ओव्हरटनने दोन तर गस ॲटकिन्सन, आदिल रशीद आणि लियाम लिव्हिंगस्टोनने प्रत्येकी एक विकेट घेतली. आता दोन्ही संघांमधील तिसरा सामना १२ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये खेळला जाईल. या सामन्यात भारतीय संघ इंग्लंडला विजयासह व्हाईटवॉश करण्याच्या उद्दिष्टाने मैदानात प्रवेश करेल.

# मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये महाराष्ट्राच्या श्रावणीचा डबल धमाका

## सुवर्णांसह मयांक चाफेकरचेही दुहेरी यश



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, हल्दवानी :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील मॉडर्न पेंटॅथलॉन प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकाची हॅटट्रिक झळकवली. ट्रायथले प्रकारातील वैयक्तिक व मिश्र रिले प्रकारात श्रावणी नीलवर्ण याने सुवर्ण पदकाचा डबल धमाका केला. पाठोपाठ श्रावणीसह मयांक चाफ ेकरने मिश्र दुहेरीत सुवर्ण व वैयक्तिक प्रकारात कांस्य पदकांची कमाई केली.

गौलापार येथे सुरू असलेल्या मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये हरियाणाच्या प्रतिस्पर्धींना मागे टाकून पुण्याची १६ वर्षीय श्रावणी नीलवर्णने सलग दोन सुवर्ण पदके जिंकून आजचा दिवस गाजविला. १८.५७.२७ मिनिटांत ट्रायथले शर्यत पूर्ण करून महिलांच्या वैयक्तिक प्रकारात श्रावणी नीलवर्णाने महाराष्ट्राचे वर्चस्व प्रस्थापित केले.

याच प्रकारातील मिश्र रिले प्रकारात 'जय महाराष्ट्रा'चा जल्लोष दिसून आला. हरियाणा व गोवा संघाच्या जोडीला मागे टाकून श्रावणी नीलवर्ण व मयांक चाफेकर यांनी बाजी मारली. त्यांनी १८.२०.४५ मिनिटांत शर्यत पूर्ण करून अव्वल स्थान पटकवले. जितेंद्र खासनीस यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणार्या श्रावणीने पर्दापणातच सुवर्ण यश संपादन केले आहे. दहावीच्या परिक्षेचा त्राण असतानाही जिद्दीने सराव करून पदक जिंकण्याचा करिश्मा श्रावणीने केला आहे.

ट्रायथलॉन शर्यतीत पुरूषांच्या वैयक्तिक प्रकारात म हाराष्ट्राने दिवसातील सलग तिसरे पदक जिंकले. ठाणेच्या मयांक चाफेकरने १६.३४.१० मिनिटांत शर्यत पूर्ण करीत कांस्य पदक संपादन केले. यजमान उत्तराखंडच्या आदित्य नेगीने सुवर्ण तर हरियाणाच्या बसंत तोमरने रौप्यपदक जिंकले. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर व पथकप्रमुख संजय शेटे, उदय डोंगरे यांनी पदकविजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. स्पर्धेतील महाराष्ट्राने हे चौथे पदक आहे.

# जिम्नॅस्टिक्सच्या ॲक्रोबॅटिकमध्ये महाराष्ट्राची पदकांच्या दिशेने आगेकूच



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९,** डेहराडून : महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जिम्नॅस्टिक्समधील ॲक्रोबॅटिकच्या विविध गटात पदकांच्या दिशेने वाटचाल कायम राखली.

राजीव गांधी क्रिकेट स्टेडियम वरील भागीरथी संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या यज्ञेश भोस्तेकर, नमन महावर, रितेश बोराडे व प्रशांत गोरे यांच्या संघाने पुरुषांच्या सांघिक ॲक्रोबॅटिक मध्ये प्रथम क्रमांकाने अंतिम फेरी गाठली. त्यांचे ४३.४६० गुण झाले आहेत.

याच क्रीडा प्रकारातील पुरुषांच्या दुहेरीत गणेश पवार व आदित्य कालकुंद्रे यांनी तिसऱ्या क्रमांकासह अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यांचे ३९.९५० गुण झाले आहेत. मिश्र दुहेरीत रिद्धी जयस्वाल व शुभम सरकटे यांनी प्रथम क्रमांकासह अंतिम फेरी गाठली. त्यांचे ३५.९७० गुण झाले आहेत.

महिलांच्या सांघिक विभागात सोनाली बोराडे, अक्षता ठोकळे व अर्णा पाटील यांच्या संघाने प्रथम क्रमांकाने अंतिम फेरी गाठली. त्यांचे ४१.७८० गुण झाले आहेत. महिलांच्या दुहेरीत ऋतुजा जगदाळे व निक्षिता खिलारे यांनी प्रथम क्रम ांकासह अंतिम फेरी गाठली. त्यांचे ३३.७४० गुण झाले आहेत.

# संपादकीय



## डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय गुंतवणूकदारांना फटका

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या शनिवारी (१ फेब्रुवारी) चीन, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांवर आयात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिकोवर प्रत्येकी २५ टक्के आणि चीनवर १० टक्के आयात शुल्क लादण्याच्या प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे. यानंतर, कॅनडाचे हंगामी पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनीही १५५ अब्ज डॉलर्सच्या अमेरिकन वस्तूंच्या आयातीवर २५ टक्के शुल्क लावण्याची घोषणा केली आहे. या टॅरिफ (आयात शुल्क) वॉरमुळे जगभरातील बाजारपेठांमध्ये मोठी घसरण दिसून येत आहे.

आज (सोमवारी), आशियाई बाजार उघडताच, त्यात मोठी घसरण दिसून आली. जपानचा निक्केई निर्देशांक २.५% ने घसरला, तर दक्षिण कोरियाचा कोस्पी निर्देशांक ३% ने घसरला आहे.

**भारतीय शेअर बाजारावरही परिणाम**

तैवानच्या शेअर बाजारामध्येही ३.५% पेक्षा जास्त घसरण झाली आहे. हाँगकाँगच्या हँग सेंग निर्देशांकातही २% पेक्षा जास्त घसरण दिसून आली. इतकेच नव्हे तर ऑस्ट्रेलियन शेअर बाजारावरही याचे परिणाम दिसून येत आहेत. अमेरिकन फ्युचर्समध्येही मोठी घसरण आली आहे. डाऊ फ्युचर्स ५५० अंकांनी घसरून व्यवहार करत आहे. भारताच्या दृष्टिकोनातून पाहिले तर, बाजार उघडताच सेन्सेक्स ६७८.०१ अंकांनी घसरून ७६,८२७.९५ अंकांवर पोहोचला होता. तर एनएसई निफ्टी २०७.९० अंकांनी घसरून २३,२७४.२५ अंकांवर पोहोचला होता.

**कमोडिटी बाजारात पडझड**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क वाढीच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय कमोडिटी बाजारातही पडझड होत आहे. ब्रेंट क्रूड ऑइलमध्ये अर्ध्या टक्क्यांहून अधिक वाढ झाली असून, ते प्रति बॅरल ७६ डॉलर्सच्या पुढे गेले आहे. चलन बाजाराबद्दल बोलायचे झाले तर, डॉलर निर्देशांक देखील १% पेक्षा जास्त वाढून १०९.७७ वर पोहोचला आहे.

**महागाई वाढण्याची चिन्हे**

अमेरिका दरवर्षी कॅनडा, मेक्सिको आणि चीनसोबत १.६ ट्रिलियन डॉलर्सचा व्यापार करते. सध्या, या टॅरिफ वॉरला फक्त कॅनडाकडून प्रत्युत्तर मिळाले आहे. मेक्सिको आणि चीनने अद्याप कोणताही निर्णय घेण्याची घाई केली नाही. कॅनडाने अमेरिकेतून आयात होणाऱ्या १५५ अब्ज डॉलर्सच्या वस्तूंवर २५% कर लादण्याची घोषणा केली आहे.

प्रथम अमेरिकेने आणि आता कॅनडाने प्रत्युत्तर म्हणून केलेल्या आयात शुल्क लादण्याच्या (टॅरिफ) घोषणेनंतर, दोन्ही देशांमध्ये तसेच जगभरातील इतर बाजारपेठांमध्ये अनेक वस्तूंच्या किमती वाढतील. कार आणि इलेक्ट्रॉनिक्सपासून ते खेळणी आणि खाद्यपदार्थांपर्यंतच्या वस्तूंवर यारे परिणाम होण्याची शक्यता आहे.

## खाडीलगत डेब्रिज टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, ऐरोली (नवी मुंबई) :** स्वच्छतेत अग्रेसर असणाऱ्या नवी मुंबई शहरात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता टाकल्या जात असलेल्या डेब्रिजमुळे शहर स्वच्छतेला बाधा पोहचत असल्याचे लक्षात घेत या बाबीकडे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार गांभीर्याने लक्ष दिले जात आहे. या अनुषंगाने परिमंडळ २ च्या अतिक्रमणविरोधी डेब्रीज भरारी पथकाने परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली धडक कारवाई करून ऐरोली सेक्टर १० येथील खाडीलगत डेब्रीज टाकताना वाहन पकडले व ताब्यात घेतले आहे. त्या वाहन मालकाकडून ३० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात येत आहे. शहर स्वच्छतेला बाधा पोहोचविणाऱ्या घटकांविरोधात यापुढील काळात अधिक धडक कारवाई करण्यात येणार आहे.

# प्रेम आठवडा : कालचं निस्सीम आणि आजचं बदलतं प्रेम

संस्कृती कोणतीही असो त्यातील प्रेम हा शब्द आणि त्यामागील भावना महत्त्वाची ठरते. भारतीय संस्कृतीतही प्रेमाला महत्त्व दिल्याचे दिसून येते. दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या ८ दिवसात तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा प्रेम आठवड्याचा उहापोह कशासाठी? हा आठवडा नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा? भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा प्रेम आठवडा आपल्या संस्कृतीप्रधान देशात हवा तरी कशाला?



एखाद्याकडे चोरून पाहणे, हसणे किंवा लाजणे हे प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी घडते. असा कुणीही नाही जो या टप्प्यातून गेला नाही. आपल्या काही मित्रांनी या टप्प्यातून जाऊन त्यांचे प्रेम मिळवले असले तरी, असे काही असतील जे अजूनही त्यांच्या प्रियकराला किंवा प्रेयसीला त्यांच्या हृदयातील गोष्टी पोहचविण्याचा प्रयत्न करत असतील. जर तुमचे प्रेम देखील दाखवण्याच्या, लाजण्याच्या आणि हसण्याच्या टप्प्यातून जात असेल, तर तुम्ही थोडे धाडस करून तुमच्या प्रियकर किंवा प्रेयसी समोर तुमचे प्रेम व्यक्त करू शकता. हा तोच महिना आहे ज्यामध्ये हवामानात प्रेमाचा रंग मिसळतो आणि वातावरण आल्हाददायक बनते. या महिन्यात, संपूर्ण जगातील प्रत्येक व्यक्ती प्रेमाच्या रंगात रंगते. संपूर्ण जग फेब्रुवारी महिन्यात १४ फेब्रुवारीला 'व्हॅलेंटाईन डे' प्रेमाचा दिवस म्हणून साजरा करते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रेम हा अविभाज्य घटक आहे. असं म्हटल्या जाते की, प्रेमाने जग जिंकता येतं. तर असेल कदाचित...पण प्रेम म्हणजे नेमकं काय असतं हो? मला सांगाल प्लिज...कारण मला याचा फारसा अनुभव नाही. प्रेमात काय, काय करावं लागतं? याची मला काहीच म्हणजे पुसटशीही कल्पना नाही. विशेष म्हणजे मी प्रेमास पात्र नाही आणि नसेलही कदाचित...हा! समजा अनवधानाने कुणी तरी कळत नकळत माझ्यावर प्रेम केलं असेल आणि करतही असेल तर तो भाग वेगळा...जर तसं असेल तर ते जिथे कुठे असतील तिथे सदैव हसत-खेळत आनंदात राहो. त्याचे सर्व दु:ख मला मिळो आणि माझं सुख त्याला...हिच माझी मनोमन ईश्वर चरणी प्रार्थना..! असं असलं तरीही आजूबाजूची परिस्थिती बघता मन सुन्न करणा-या घटना आणि कटूसत्य अनुभवास येते.

खरं तर माणसाला सर्वप्रथम कशाची गरज असेल तर ती प्रेमाची...प्रेम हेच जीवन आहे. जीवनाच्या या प्रवासात कितीही संकटे, अडथळे आली तरी आपण कोणत्या ना कोणत्या मार्गाने ते दूर करू शकतो. पण एखाद्या व्यक्तीच्या तिरस्काराने मात्र आपण पूर्णत: हतबल होतो. प्रेम ही जीवनाला परिपूर्ण करणारी भावना असून ती एक अलौकीक शक्ती आहे. म्हणून प्रत्येकाने आयुष्यभर मनमोकळे प्रेम करावे. एकदा का तुम्ही प्रेमाचे शिखर सर केले तर खरं प्रेम काय असतं ते तुम्हाला कळेल...प्रेम हे एक असं नातं आहे की, प्रत्येक व्यक्ती ते मनापासून निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. स्वेच्छेने एखाद्यास मानतो आणि दु:खाचे क्षण, अपयशाचे प्रसंग, सुखाच्या आठवणी हक्काने त्यांच्यासोबत वाटून घेतो. परस्परातील मतभेद असं सारं काही बाजूला ठेवून दोन हृदय एकमेकांच्या जवळ येतात. दोन व्यक्तीतील परस्पर हृदयाचा तो गारवा असतो.

प्रेम ही मनुष्याला मिळालेली नैसर्गिक व अनमोल देणगी आहे. खरं प्रेम विना अपेक्षेने आपोआपच होवून जातं. दोन मन केव्हा, कशी व कोणत्या परिस्थितीत जुळतात हे उमजतच नाही. प्रेमामध्ये इतकी प्रचंड शक्ती असते की, माणूस असाध्य गोष्ट ही साध्य करू शकतो. त्यासाठी फक्त त्याला प्रेमाची साथ हवी असते. प्रेम ही परमेश्वराची अशी देण आहे जी अंत:करणातून निर्माण होवून आयुष्यातील क्षणांना सोनेरी करते. कारण माणूस एका यशोशिखरावर प्रगतीनं तेव्हाच झगमगू शकतो, जेव्हा त्याच्या पाठीशी एक प्रेरणात्मक शक्ती उभी असते. ती शक्ती म्हणजे आपल्यावर प्रेम करणारी व्यक्ती असते. केवळ माझ्या शुभेच्छा नेहमी तुमच्यासोबत असतील. खूप मोठे व्हा आणि खूप नाव कमवा म्हटल्यानं कुणी मोठं होत नाही. प्रेमातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याग व विश्वास...कारण ज्याच्यावर आपण प्रेम करतो, त्याचे सुख कशात आहे हे शोधून त्याच्या सुखासाठी आपल्या सुखाची होळी करावी लागते. प्रेम शेवटपर्यंत यशस्वी होतंच असं नाही. काहींना त्यात रडावंही लागतं. जसं...यासाठी प्रचंड विश्वासाची साथ व विचारांची जुळवणूक असावी लागते.

प्रेम हा शब्द प्रत्येकाच्या जीवनात प्रतिसाद घालतो. ते आई-वडिलांचे, भाऊ-बहिणीचे, मित्र-मैत्रीणीचे किंवा प्रियकर-प्रेयसीचे...आपण जीवनात पहिलं प्रेम हे आपल्या आई (वडील) वर करत असतो, हे तर सर्वश्रूतच आहे. पण याच्याही व्यतीरिक्त आपण एका अशा खास व्यक्तीवर प्रेम करतो, जी व्यक्ती आपल्या हृदयात विशिष्ट स्पंदने निर्माण करतो. ज्याची जागा नंतर कुणीही घेवू शकत नाही. प्रेमाला वयाचं बंधन नसते. ते कोणत्याही वयात, कोणत्याही क्षणी एक वेगळ्याच प्रतिक्रिया घेवून प्रत्येकाच्या जीवनात निर्माण होतात.

प्रेमाची नेमकी व्याख्या अजूनही कुणाला करता आली नाही आणि प्रेम करण्याची पद्धत पण थोडी वेगळी आहे. आजचा युवक असो की युवती फक्त बाह्यांग बघत असते. तो किंवा ती दिसायला किती सुंदर आहे? त्याची राहणीमान आधुनिक पद्धतीनुसार म्हणजे स्टायलीश असल्यास तर मग सांगायचं काही कामच नाही. म्हणजे एकुणच तो आपल्या गरजा पूर्ण करू शकतो का? याचा निकष लावला जातो. म्हणून अशा मुलांवर प्रेम केल्या जाते. याचा कधीच विचार केल्या जात नाही की, तो खरोखर प्रेम करतो की फक्त शारिरीक आकर्षणापुरता...एखाद्या सामान्य कुटूंबातील साधी राहणीमान असणारा मुलगा एखाद्या मुलीवर अंतर्मनातून प्रेम करतो. पण तो आजच्या स्टायलीश पद्धतीनुसार राहू शकत नाही. पण त्याचे तिच्यावरचे प्रेम हे त्याच्या हृदयात कायमचे घर केलेले असते, खरे असते, निस्सीम असते. पण ती मुलगी त्या मनापासून प्रेम करणा-याला कधीच स्वीकार करत नाही. याचे एकमेव कारण म्हणजे तिने लावलेले निकष तो पूर्ण करू शकत नाही. आजच्या युगात या गोष्टींचा विचार केला जातो. पण त्याचे प्रेम किती निर्मळ, पवित्र, अपार आहेत ज्याला मर्यादा नाही हे कधीच बघितल्या जात नाही. या ख-या प्रेमाला आजच्या घडीला काहीही किंमत नाही. प्रेमाला स्विकारणे गरजेचे आहे. असे अनेक व्यक्ती आहेत ज्यांना प्रेमाची भाषा कधी कळत नाही आणि असेही काही आहेत जे कळूनसुद्धा प्रेमाला स्वीकारू शकत नाही.

अंतरंग तर चुकूनही कुणी बघत नाही. समजा बाह्यांगावरून चांगली आढळणारी गोष्ट अंतरंगातूनही चांगली असतील याची काय शाश्वती? असो! एकदा अंतरंग बघा! म्हणजे त्याचे मन किती पवित्र आहे? त्याचे विचार किती श्रेष्ठ आहे? एकुणच आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा आहे? इत्यादी गोष्टींचा सारासार विचार करायला पाहिजे. ठिक आहे! आपल्या घरालगतच्या पुढील जागेला आपण अंगण म्हणत असतो. वरून ते आपल्याला अंगण वाटत असलं तरी काय माहित अंतरंगात सोन्याची खाणही असू शकते. याचा कुणीही विचार केला आहे का?

प्रेम हे कसं असावं? कृष्ण-राधासारखं निस्सीम, निर्मळ, हिर-राजासारखं अजरामर नि शहाजहानने बांधलेल्या ताजमहालच्या प्रतिकासारखं...या सर्वांच्या प्रेमकथा अजरामर आहे आणि इतिहास याला साक्ष आहे. आजचं चित्र खुपच विचित्र आहे. प्रेमाला सुरुवात झाली न झाली पहिली डिमांड असते मोबाईलची...त्यानंतरची वस्तुस्थिती तुम्हाला माहितच आहे. काही तर फक्त नि फक्त प्रेमाचा दिखावा करत असते आणि आपल्या गरजानुसार त्याचा वापर करत असते. प्रेमाच्या वाटेत सुखरुपी फुले आणि दु:खरुपी काटे असते. यासाठी प्रत्येक पाऊल विचारपूर्वक व जपून टाकावं लागते. आपले पाऊल काट्यावर पडले तरी चालेल. कारण यामुळे फक्त आपल्याला वेदना होतील. परंतु जर आपले पाऊल त्या फुलावर पडले तर त्या फुलाचे सौंदर्य, जीवनच नष्ट होईल. म्हणून आपल्या मनाच्या कोप-यात एखाद्याला जागा द्यायची असल्सास ती आयुष्यभरासाठी द्यावी. अन्यथा त्या गोष्टीचा विचारच मनात आणू नये. पण वास्तविक जीवनाचं स्वरूप थोडं वेगळं आहे. कुणी तरी आपल्या जीवनात डोकावतं, आपल्या भावनांशी खेळतं. हा खेळ सुरू असताना आपण उज्ज्वल संसाराचे स्वप्न रंगवीत असतो. पण ते आपल्याला स्वप्नांच्या सोनेरी क्षितीजावर स्वप्न दाखवून, दुराव्याच्या खाडीत ढकलून जीवनाच्या अर्ध्या वाटेवरच सोडून जातात. प्रत्येकालाच प्रेम करणारं कुणीतरी आपलं हवं असतं. जीवन जगायला नव्हे तर फुलवायला. तारुण्यात तर असं विश्वासाचं, जिव्हाळ्याचं, आपुलकीचं नातं, नकळत जुळून येणारं नातं प्रत्येकाला आपल्या आयुष्यात हवहवसं वाटतं.

प्रेमातील सर्वात महत्त्वाची अडसर म्हणजे जात...ब-याच प्रेमींचं ब्रेकअप हे जातीमुळेच होत असते. मला एक सांगता का हो! आदिमानवाच्या काळात किती जाती होत्या? या जातीची उत्पत्ती कुठून झाली आहे? याचा आजचा समाज का बरं विचार करत नाही. का बरं आपला समाज प्रेम भावना समजून घेण्याइतपत अजून सक्षम झालेला नाही. ही एक प्रेमाविषयीची शोकांतिका आहे. प्रेमाला समजून न घेतल्यास अशी कित्येकांचे प्रेम मनातच दडपल्या जातात. त्यांच्यात जातरुपी अंतरपाट वियोगाची भिंत बांधल्या जाते. तसं बघता जाती दोनच स्त्री आणि पुरुष...बरं ठिक आहे! मी पण तुमच्या विचारांशी सहमत आहे. मला दाखवता का असा व्यक्ती ज्यांचं रक्त सप्तरंगापैकी एक आहे. मग का बरं इतकी चुकीची विचारधारणा...

मला एक कळत नाही की, जेव्हा एखाद्याचं लग्न जुळतं, तेव्हा ते तोडावं नाही पण जोडावं असं म्हटल्या जाते. मग प्रेम करणा-यांना का बरं तोडल्या जाते. तेव्हा त्यांची संस्कृती, संस्कार कुठे गहाण पडलेली असते. खरं तर लग्नातील जोडपं प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत अनभिज्ञ असते. पण प्रेमात तर एकमेकांच्या सर्वच गोष्टी जाणून असते. ते देहाने जरी अलग असले तरी पण मनाने, हृदयाने मात्र एकच असते.

**आमच्या काही लेखक लेखिकांचे**
**थाटामाटात प्रेमविवाह उरकले आहे**
**यशस्वी संसाराच्या गाड्याची चाके**
**सामाजिक गालबोटाने डगमगले नाही**

**शब्दस्पर्शी : सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

## आप धाप...

भ्रष्टाचार मुक्तीस्तव
सन्माने पधारे आप
हातात धरुनि झाडू
दुर्गंधी प्रयासे साफ

सुरवातीच्या वर्षांत
कारभार टापो टाप
विरोधात उभे रहायं
कुणाचीनव्हती टाप

कळले नाही डसले
अस्तनीतले ते साप
स्वच्छ शुध्द म्हणता
मनात घुसू पाहेपाप

भस्म्या रोग जडला
उसळे उद्रेक संताप
मदिरा मदमस्त होई
उघडे होतात प्रताप

उधळलेल्या घोड्या
सुयोग्य बसला चाप
जनता आहे चौकस
पदरात घातले माप

हातास मिळेभोपळा
पुरताचं सुपडा साफ
जनप्रक्षोभ उसळला
पाय उतार होई आप

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७५ वर्ष पूर्ण होऊन ७६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते.

स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे.

जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## वाट पाहीन पण 'एसटी'नेच जाईन...
## हात दाखवूनही थांबेना 'लालपरी'



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०९, कुंडलवाडी (नांदेड) :** 'वाट पाहीन पण एस.टीनेच जाईन' ही टॅग लाईन व 'प्रवाशांचे सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य असलेल्या एस.टी.नेच महिला प्रवाशाने हात दाखवूनही न थांबल्याने 'वाट पाहीन पण एस.टी.ने जाईन' या वाक्याचा बोजवारा उडाला आहे. काही बेशिस्त ड्रायव्हर व कंडक्टर यांच्या मनमानी मुळे प्रवाशातून संताप व्यक्त होत आहे. अमृत वर्षा निमित्त महाराष्ट्र शासनाने ७५ वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना एसटीचा प्रवास मोफत केला आहे. त्याचप्रमाणे सर्व महिला प्रवासांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकिटामध्ये ५० टक्के सवलत जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे सर्वांसाठी एसटीचा प्रवास हा विश्वासाचा आणि सुरक्षित असल्याने एसटीलाही सध्या चांगले दिवस येऊ लागले आहे. बहुतांश एसटी बस मध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी उभे राहूनही प्रवास करीत असले तरीही नागरिक प्रवासासाठी एसटीलाच पसंती देताना दिसतात. कुंडलवाडी येथील चुंगी नाक्याजवळ अनेक विद्यार्थी तसेच अनेक ज्येष्ठ नागरिक महिला थांबलेले असतात. बऱ्याच वेळा वाढती उष्णता पाहून लोक झाडे तसेच आजूबाजूला सावली ठिकाणी आसरा घेतात अशा वेळेस रस्त्यावर दिसले नाही म्हणून गाडी भरधाव वेगाने पळविणे योग्य नाही . काही क्षण का होईना लालपरीला ब्रेक मारणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळा बायका लहान लेकरे एसटीला थांबा-थांबा म्हणून पळताना चे चित्र दिवसेंदिवस अधिक प्रमाणात दिसत आहे. यासाठी आगार प्रमुखांनी वाहन चालक व तसेच कंडाक्टर यांना सूचना द्याव्या. यंदा दहावी आणि बारावीच्या परीक्षा आहेत विद्यार्थ्यांचे भवितव्य यावर आधारित आहेत याचा विचार करून अर्धा मिनिटे का होईना, थांबणे गरजेचे आहे. याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

## दहावी, बारावी विद्यार्थ्यांची हॉल तिकीटासाठी अडवणूक करू नये

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील काही शाळांमध्ये विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क भरावयाचे बाकी असेल तर त्यांना दहावी / बारावी परीक्षेचे हॉल तिकीट दिले जात नाही, अशा काही तक्रारी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाकडे प्राप्त होत आहेत. सदरची बाब अत्यंत गंभीर असून यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते व त्याच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो.

तरी या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी शाळा व्यवस्थापनांना नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने सूचित करण्यात येते की, एखाद्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क भरणा करणे पालकांच्या काही अडचणींमुळे शक्य होत नसेल तर त्यांच्याशी संवाद साधून शैक्षणिक शुल्क भरणा करणे आवश्यक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यांना शुल्क भरता यावे याकरिता पर्याय उपलब्ध करुन द्यावेत. तथापि दहावी / बारावी परीक्षेचे हॉल तिकीट न देता त्यांची अडवणूक करु नये. शाळा सोडताना शाळेचा दाखला देण्यापूर्वी शैक्षणिक शुल्क भरून घेण्याचा पर्याय शाळा व्यवस्थापनाकडे उपलब्ध असताना अशा प्रकारे हॉल तिकीट देताना अडवणूक करणे अयोग्य आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अशा प्रकारची कोणतीही तक्रार करावयाची असल्यास संबधित पालकांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांस ०२२ २७५६७०४३ अथवा उपआयुक्त शिक्षण संघरत्ना खिल्लारे यांस ०२२ २७५६७०६७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०९, पंढरपूर :** राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज माघ शुद्ध जया एकादशीनिमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते क्रीडा मंत्री श्री भरणे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार सचिन लंगुटे, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. माघी शुध्द जया एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले आहेत. मंदिर मंदिर परिसर तसेच प्रदक्षिणा मार्गावर मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी लक्षात घेऊन तसेच भाविकांना वाहतुकीचा कोणताही त्रास होऊ नये क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे यांनी शिवाजी चौक येथून मंदिरापर्यंत दर्शनासाठी चालत गेले.

## परीक्षा कॉपीमुक्त अभियानांतर्गत सूक्ष्म नियोजनात पार पाडण्यासाठी सर्व पर्यवेक्षकांना आवाहन



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.०९, श्रीगोंदा :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेसंदर्भात बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्टचे परिक्रमा सायन्स कॉलेज काष्टी या केंद्रावरती नुकतीच सर्व पर्यवेक्षक व केंद्रसंचालक सहाय्यक केंद्रसंचालक यांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये परिक्रमा सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. इथापे पी.ए.यांनी अतिशय सूक्ष्म नियोजनामध्ये मंडळाच्या निर्देशानुसार परीक्षा पार पाडण्यासाठीच्या कडक सूचना सर्व पर्यवेक्षकांना दिल्या. यावेळी श्रीगोंदा तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष मखरे सर या केंद्रासाठी नियुक्त केंद्र संचालक काकडे सर व सर्व पर्यवेक्षक उपस्थित होते. मंडळाने ठरवून दिलेल्या निकषानुसार कॉफीमुक्त अभियांतर्गत परीक्षा पार पाडण्यासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अ‍ॅड.प्रतापसिंह बबनराव पाचपुते तसेच संस्थेच्या अध्यक्षा डॉ.प्रतिभा पाचपुते व संस्थेचे सचिव तथा तालुक्याचे विद्यमान आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# तायक्कांदोत महाराष्ट्राला १४ पदके !

## गौरव भटला सुवर्ण, नयन बारगजे, शिवानी भिलारेला रौप्य...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुंबई :** राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राने तायक्कांदो स्पर्धेत मिश्र दुहेरी सुवर्ण पदकासह दोन रौप्य आणि चार ब्राँझपदकांची कमाई केली. वंश ठाकूर व मृणाली हर्नेकर जोडीने सुवर्ण पदकाला गवसणी घातली, स्पर्धेत दोघांचे सलग दुसरे पदक आहे. वैयक्तिक प्रकारात मृणालीने रौप्य, तर वंश पदक जिंकले आहे. महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १४ पदकांची कमाई केली आहे.

मानसखंड क्रीडा संकुलात सुरू असलेल्या स्पर्धेत ४९ वजन गटात नयन बारगजेला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. शिवानी भिलारेनेही रौप्य, तर साक्षी पाटील, अभिजित खोपडे, वसुंधरा छेडे यांनीही ब्राँझपदकांची लयलूट केली. गौरव भट सुवर्णपदक, ब्राँझपदक भारती मोरे, मनीषा गुत्तेदार, आयुष ओहोळ, श्रेया जाधव, दुहेरीमध्ये वसुंधरा छेडे आणि शिवम भिसले ब्राँझपदक, मिश्र पूमसे प्रकारात वंश ठाकूर व मृणाली हर्नेकर यांनी अरुणाचल प्रदेशच्या जोडीवर रोमहर्षक मात केली.

महाराष्ट्राने ८.२३३ गुणांची मजल घेत सुवर्णपदकावर नाव कोरले. वैयक्तिक पूमसे प्रकारात मृणाली हर्नेकरने यश संपादन केले. अरुणाचल प्रदेश विरूद्ध महाराष्ट्राची लढत ८.२३२ गुणांवर बरोबरीत झाली. मात्र, अरुणाचलने प्रभावी प्रदर्शन केल्याने पाईंट १ गुणांनी महाराष्ट्राचा निसटता पराभव झाला.

५७ किलो गटातील उत्तराखंडच्या पूजा कुमारी या स्थानिक खेळाडूला प्रेक्षकांचा मोठा पाठिंबा मिळत होता, तरीही महाराष्ट्राच्या शिवानी भिलारे हिने शेवटपर्यंत कौतुकास्पद लढत दिली. अखेर शिवानी हिला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. शिवानी व पूजा यांच्यातील ५७ किलो गटाची लढत अतिशय रंगतदार झाली. दोन्ही खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावून ही लढत खेळली. त्यामुळे शेवटपर्यंत त्यामध्ये उत्सुकता राहिली होती. वजनी गटात साक्षी पाटील (४८ किलो) व अभिजित खोपडे (५४ किलो), तर वैयक्तिक पूमसे प्रकारात वंश ठाकूर व वसुंधरा छेडे या चौघांनीही उपांत्य फेरीपर्यंत मजल गाठताना सातत्यपूर्ण कामगिरी केली होती. उपांत्य फेरीत पराभूत झाल्यानंतर त्यांना ब्राँझपदक बहाल करण्यात आले.

# जिम्नॅस्टिक्सच्या एक्रोबॅटिक व एरोबिक्स प्रकारात महाराष्ट्र अंतिम फेरीत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, डेहराडून :** गतवर्षी पाच सुवर्णपदकांसह गोव्यातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा गाजविणाऱ्या महाराष्ट्राने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतही जिम्नॅस्टिक्समध्ये धडाकेबाज सुरुवात केली. एक्रोबॅटिक व एरोबिक्स या दोन्ही प्रकारात महाराष्ट्राने अंतिम फेरी गाठून आपला दबदबा कायम ठेवला.

भागीरथी संकुलात शनिवारपासून जिम्नॅस्टिक्स स्पर्धेला प्रारंभ झाला. या स्पर्धेत महाराष्ट्रासह प. बंगाल, हरयाणा व कर्नाटक या पाच राज्यातील संघ सहभागी झाले आहेत. महिला दुहेरीत ऋतुजा जगदाळे आणि निक्षिता खिल्लारे या जोडीने बॅलन्स सेटमध्ये नेत्रदीपक रचना सादर करून २१.११० गुणांसह अव्वल क्रमांक मिळविला. पुरुष दुहेरीत गणेश पवार व आदित्य कालकुंद्रे ही जोडी २१.७५० गुणांसह दुसरा स्थानावर राहिली. मिश्र दुहेरीत शुभम सरकटे व रिद्धी जयस्वाल जोडीने सर्वाधिक १९.०१० गुणांची कमाई केली.

महिला गटात सोनाली कोरडे, आर्णा पाटील व अक्षता ढोकळे या महाराष्ट्राच्या त्रिकुटाने २२.३९० गुणांची कमाई करीत अपेक्षेप्रमाणे अव्वल स्थान मिळविले. पुरुष गटात रितेश बोखडे, प्रशांत गोरे, नमन महावर व यज्ञेश बोस्तेकर या जोडीने सर्वाधिक २३.६७० गुणांसह प्रथम स्थान मिळवीत महाराष्ट्राचा दरारा कायम ठेवला. एरोबिक्स प्रकारातही महाराष्ट्राचाच दबदबा बघायला मिळाला. या प्रकारातही महाराष्ट्राने महिला दुहेरी, पुरुष दुहेरी, मिश्र दुहेरी, महिला गट व पुरुष गटात नेत्रदीपक कामगिरी करीत सुवर्ण पदकाच्या आशा पल्लवित केलेल्या आहेत. मिश्र दुहेरी

श्रीपाद हराळ व मानसी देशमुख या जोडीला १५.१५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. मिश्र तिहेरी आर्य शहा, स्मित शहा व रामदेव बिराजदार या त्रिकुटाने १६.२५ गुणांसह प्रथम क्रमांक पटकाविला. पुरुष गटात संदेश चिंतलवाड, स्मित शहा, अभय उंटवाल, उदय मधेकर, विश्वेश पाठक यांनी १५.८० गुणांसह पहिले स्थान मिळवित महाराष्ट्राचे वर्चस्व प्रस्तापित केले.

# आमदार अभिजीत पाटील यांचे नियोजनात विठ्ठलचा गाळप हंगाम वेगात - रणदिवे

## (आत्तापर्यंत ५.५० लाख मे.टन ऊसाचे झाले गाळप)





**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०९, पंढरपूर :** शेतकर्यांचा राजवाडा म्हणून ओळख असलेल्या पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील विठ्ठल सह.साखर कारखान्यावर सत्तांतर झालेनंतर आमदार अभिजीत पाटील यांचे नियोजनात व्हाईस चेअरमन रोंगे आणि संचालक मंडळाचे सहकार्याने कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस व ऊस उत्पादक शेतकरी केंद्रस्थानी ठेवून सर्वजण काम करीत आहेत. ऊस उत्पादक सभासद शेतकर्यांचे पाठबळ आणि विश्वासावर यंदाचा गळीत हंगाम वेगाने सुरू असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे संचालक विठ्ठल (नाना) रणदिवे यांनी व्यक्त केले.

तंत्रज्ञानाची जोड असल्याशिवाय कृषिक्षेत्रात वाढ होणे अशक्य आहे, ही बाब लक्षात घेऊन आपल्या कारखान्याच्या माध्यमातून ऊस शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग नेहमीच राबविण्याचा संकल्प चेअरमन अभिजीत पाटील यांचा असतो.

कारखान्याचे व्हा. चेअरमन, आजी-माजी संचालक, सभासद, कार्यकारी संचालक, सेक्रेटरी, इतर अधिकारी, कर्मचारी व पंढरपूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी सभासद यशस्वी गाळपासाठी प्रयत्नशील आहेत. चेअरमन अभिजीत पाटील यांनी ऊस उत्पादकांना दरासंदर्भात दिलेला शब्द ते नक्कीच पुर्ण करणार इतका विश्वास शेतकर्यांना आहे.

म्हणूनच या विश्वासाचे पाठबळावर करखान्याची यंत्रणा सुरू असुन सर्व शेतकर्यांचे ऊसाचे टिपरू गळीतास आणलेशिवाय कारखाना बंद केला जाणार नाही याची काळजी कारखाना प्रशासनास असुन आत्तापर्यंत दररोज सरासरी साडे सात हजार मे.टनाने साडे पाच लाख टन ईतके ऊसाचे गाळप केलेले आहे.

संचालक मंडळातील सर्व संचालक शेतकर्यांशी समन्वय साधत प्रयत्न करीत असल्याचेही रणदिवे यांनी सांगितले. यंदा गतवर्षीच्या तुलनेत विठ्ठल कारखाना प्रशासनाने ऊस गाळपाचे उद्दिष्ट नक्कीच पुर्ण करणार असुन मागील चेअरमन आणि संचालक मंडळाचे कार्यकाळातील ऊस उत्पादक शेतकर्यांची, तोडणी वाहतूकदारांची बीले आणि कामगारांचे पगारी देण्याचे काम विद्यमान चेअरमन आणि आमदार अभिजीत पाटील यांनी केल्याने शेतकरी समाधानी आहे. शेतकर्यांचे विश्वासाचे पाठबळावर चालु गाळप हंगाम वेगात सुरू आहे.

# मंत्रालय समोर शेकडो आदिवासी बांधवांचा आत्मदहन करण्याचा इशारा...



**अक्षराज : गणेश भवार**

**दि.०९, पनवेल :** मौजे वाघऱ्याची वाडी टेंभोडे व सागवाडी वळवली सर्व्हे नं.१०४ ,४९ मध्ये पिढीन-पिढी १५० ते २०० घरे आदिवासी समाजाचे असून या परिसरात ४ ते ५ वर्षे झाली कुठलीही शासनाची परवानगी न घेता अनधिकृत दगडखाण चालत असून त्या ठिकाणी बेकायदेशीर क्रशर व अतिदबावाचे स्फोटक वापरुन ब्लास्ट करीत आहेत. त्या परिसरातील आदिवासी वाडीतील घरांना ब्लास्टिंगच्या हादरे बसून पूर्ण घरांना तडे गेलेले आहेत व त्यांनी डोंगर भागात लागवड केलेले भाजीचे मळे सह पूर्ण डोंगर भाग फोडून वृक्षतोड सुध्दा केलेली आहे तसेच वारंवार जास्त दबावाचे स्फोटक वापरल्याने डोंगरभागात प्यायचे पाणी सुध्दा नाहीसे झाले आहे व गुरे प्राणी सुद्धा मरण पावले आहेत त्या अनुषंगाने त्या ठिकाणचे आदिवासी बांधवांनी २६ जानेवारी २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल यांचे समोर आमरण उपोषण केले होते व उपविभागीय अधिकारी(प्रांताधिकारी) यांनी ७ दिवसात नियमाप्रमाणे अनधिकृत दगडखाणींवर व गौणखनिज बाबत योग्य ती कार्यवाही करू असे पत्र देऊन आदिवासी बांधवांचे आमरण उपोषण स्थगित केले होते तसेच उपविभागीय अधिकारी यांनी दिलेली मुदत संपूनही काही एक कार्यवाही न झाल्याने आदिवासी बांधव हे संतापलेले आहेत व तसेच स्थानिक राजकीय नेते यांचे सांगण्यावरून सिडको अतिक्रमण विभागीय अधिकारी सुध्दा अर्धवट कार्यवाही करून राजकीय नेत्यांच्या दबावापोटी थातुर-मातुर कार्यवाही करून पलायन घेत आहेत.आदिवासी समाजावर होत असलेले शासकीय व गैरशासकीय जुलूमामुळे प्रगती थांबली असून आदिवासी या मातीचा मूळ मालक असताना त्यांच्या वाड्या-वस्त्यांचे पुनर्वसन न करता काही शासकीय कर्मचारी मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, सिडको भूमापन अधिकारी अनधिकृत बांधकाम विभागीय अधिकारी रायगड भवन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी रायगड भवन, जिल्हाधिकारी रायगड कार्यालय अधिकारी ,उपविभागीय कार्यालय अधिकारी व स्थानिक राजकीय नेते यांना दगड खाणी मालकांनी हाताशी धरून टेंभोडे ,वळवली व आदई गाव परिसरात अनधिकृत दगडखाणी चालवीत आहेत व डोंगर भागाची विलेवाट लावून अनधिकृतपणे ४ ते ५ वर्षे झाले ब्लास्टिंग करून बेकायदेशीर रात्री-बेरात्री खाणकाम चालवून गौण खनिज विकून आदिवासी बांधवांवर अन्याय करीत आहेत व शासनाचा महसूल बुडवीत आहेत.त्यामुळे भारतीय संविधान मार्गाने लोकशाही पद्धतीने जीवन जगण्यासाठी सरकारी यंत्रणेकडून आदिवासी बांधवांना सहकार्य होत नसल्यामुळे व दगडखाणी मालकांना शासकीय महसूल विभागीय अधिकारी तसेच सिडको यांनी पाठीशी घालून करोडो रुपयांचा महसूल बुडविल्यामुळे दि.५ मार्च २०२५ रोजी वर्षा बंगला मुख्यमंत्री निवासस्थान किंवा मंत्रालय समोर आदिवासी बांधवांनी निष्क्रिय सरकारी यंत्रणेचा निषेध म्हणून आत्मदहन करण्याचा निर्णय घेतलेला आहे तसेच या सर्व परिस्थितीला जबाबदार बेकायदेशीर दगडखाण चालविणारे मालक व त्यांचे वर जुलूम करणारे संबंधित सरकारी यंत्रणेचे कर्मचारी असतील अशी माहिती संबंधित ठिकाणच्या जोमी गिरा व ईतर आदिवासी बांधवांनी पत्रकारांना दिलेली आहे.

# रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा, जनसामान्यांची सेवा हाच धर्म - उपमुख्यमंत्री शिंदे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, ठाणे :** हे शासन सर्वसामान्यांचे असून त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठीरुग्ण सेवा हीच ईश्वर सेवाआणिजनसामान्यांची सेवा हाच धर्मया तत्वांवर चालणारे असून नेहमीच सर्वसामान्यांसाठी काम करीत राहील, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवार, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी केले.सार्वजनिक आरोग्य विभाग वतीने ६ डे-केअर किमोथेरपी सेंटर (ठाणे, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व वर्धा) उभारण्यात येणार असल्याची घोषणा आणि कर्करोग म ोबाईल व्हॅन-८, १०२ रुग्णवाहिका-३८४, सीटी स्कॅन-२, ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका-७, डिजिटल हँड हेड एक्स-रे मशिन-८० चा लोकार्पण सोहळा जिल्हा नियोजन भवन सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी आयुष मंत्रालय तसेच स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग मंत्री प्रकाश आबिटकर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, विधानपरिषदेच्या उपसभापती श्रीमती नीलम गोऱ्हे, आमदार डॉ.बालाजी किणीकर, नगरविकास विभागचे प्रधान सचिव असिम कुमार गुप्ता, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव नविन सोना, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई संचालक अमगोथू रंगा नायक, आरोग्य सेवा संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, राष्ट्रीय नागरी अभियानाचे संचालक डॉ.स्वप्नील लाळे, सुप्रसिध्द अभिनेता तथा माजी खासदार गोविंदा, माजी मंत्री विजय शिवतारे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, मी नेहमीचजनसामान्यांची सेवा हाच धर्मअसे मानून काम करीत आलो आहे. आत्ताच खोपट बस डेपो येथे एसटी ड्रायव्हर व कंडक्टर यांच्यासाठी निर्माण केलेल्या उत्तम दर्जाच्या विश्रांती गृहाचे उद्घाटन केले. त्याचबरोबरजिथे एसटी डेपो तेथे कॅशलेस हॉस्पिटलही संकल्पना संपूर्ण राज्यासाठी जाहीर केली आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेआपला दवाखानाराज्यात ७०० पेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत आहे. महिलांचे कुटुंबाच्या आरोग्याकडे पूर्ण लक्ष असते, परंतु स्वतःच्या आरोग्याकडे काहीही लक्ष नसते. आज आपण लोकार्पण केलेल्या या मोबाईल आरोग्य तपासणी यामुळे प्रत्येक गावागावातील महिलांची आरोग्य तपासणी करणे सहज साध्य होणार आहे. कॅन्सर संपविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.म ाझ्या अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात मी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून जवळपास ५१ हजार रुग्णांचे प्राण वाचवू शकलो. तब्बल ४६० कोटी रुपयांचे सहाय्य आपण गरजू रुग्णांना करू शकलो, यापेक्षा मोठे समाधान नाही, असे सांगून श्री. शिंदे म्हणाले की, हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. त्यांच्या आयुष्यात बदल घडविणे, हेच या शासनाचे ध्येय आहे. समाजातील सर्व घटकांसाठी विविध योजना सुरू केल्या, रखडलेले प्रकल्प मार्गी लावले. सर्वसामान्यांचे हे शासन असेच जोमाने काम करीत राहील. लवकरच उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा ही श्री.शिंदे यांनी यावेळी केली.आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आरोग्य विभागाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू केले असून, जवळपास दोन कोटी महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्याचा त्यांनी संकल्प केला आहे. यासाठी शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री पुढे म्हणाले की, महात्मा फुले आरोग्य योजनेंतर्गत आधी दीड लाखापर्यंतची मदत केली जात होती. परंतु आता या शासनाने सरसकट सर्वांसाठी त्याची मर्यादा पाच लाखापर्यंत केली आहे. दुर्गम भागातील जनतेसाठी ही हे शासन तत्परतेने काम करण्यास कटिबद्ध आहे.कॅन्सर, टी.बी., हृदयरोग अशा आजारांचे निदान लवकरात लवकर झाल्यास त्यावर उपचार करणे शक्य आहे. त्यामुळे आरोग्य तपासणी या उपक्रम ाचा सर्वसामान्य नागरिकांना निश्चित लाभ होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवाअसे मानून श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मदत करण्यात आली आहे. गेल्या आठ वर्षात हृदयाला छिद्र असणाऱ्या ५ हजार ५०० लहान बालकांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या, हीच तर खरी पुण्याई आहे, असे सांगून श्री. शिंदे पुढे म्हणाले की, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी ही व्यवस्थेची महत्त्वाची दोन चाके आहेत. त्यांनी एकत्र मि ळून जनतेच्या हिताची कामे करणे अपेक्षित आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी चांगली कामे केली म्हणूनच शासन लोकोपयोगी योजना यशस्वीपणे राबवू शकले. त्यापैकीच एकशासन आपल्या दारीहा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला. संपूर्ण राज्यात पाच कोटी लाभार्थ्यांना विविध लाभ देण्यात आले. हे शासन गतिमान आणि लोकाभिमुख आहे आणि यापुढेही हे शासन अशाच प्रकारे काम करेल, असेही ते शेवटी म्हणाले.आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आपल्या म नोगतात उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व ते पुढे म्हणाले की, राजकारणी सर्वसामान्यांसाठी काम करणारे असावेत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे काम पाहिले की याची खात्री पटते. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून आजपासून राज्यातील २ कोटी महिलांची आरोग्य तपासणी होणार असून यामध्ये रक्त तपासण्या, हिमोग्लोबिन, मधुमेह, रक्तदाब, आवश्यकतेनुसार सर्व तपासण्यानिदान व उपचार करण्यात येणार आहेत. हा सुरु करण्यात आलेला उपक्रम महाराष्ट्रातील तमाम मायमाऊलींसाठी सम र्पित आहे. यावेळी आयुष मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सातारा जिल्ह्यातील दरे गावात आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून ७० कोटी निधी खर्चून नॅचरोपॅथी आणि वेलनेस सेंटर त्याचबरोबर राष्ट्रीय स्तरावरील हरबल गार्डन उभारण्यात येईल, अशी घोषणा केली. तसेच आयुर्वेदाचे म हत्व प्रत्येक भारतीयाला कळण्यासाठी हर घर आयुर्वेद या उपक्रमाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला.




### जिल्हा परिषदेच्या पुढाकारातून म ायका ॲपचे झाले लोकार्पण

सुदृढ मानसिक आरोग्यासाठी सम ुपदेशन करणाऱ्यामायकाया ॲपचे लोकार्पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.या अपॅचा लाभ सर्व वयोगटातील नागरिकांना होवू शकतो. गुगल प्ले स्टोअरवरुन हे ॲप डाऊनलोड करता येवू शकते, अशी माहिती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्यात कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी उत्कृष्ट कार्य केलेल्या कर्करोग तज्ञ डॉक्टरांचा, राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट काम केलेल्या डॉक्टरांचा, दंतचिकित्सक तज्ञ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच टी.बी. मुक्त भारत अभियानांतर्गत निक्षय मित्र फूड बास्केट चे वितरण क्षयरोग रुग्णांच्या नातेवाईकांना करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका मृण्मयी भजक यांनी केले तर आभार प्रदर्शन आरोग्य उपसंचालक डॉ.अशोक नांदापूरकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कसा असेल सार्वजनिक आरोग्य विभागाचा उपक्रम

राज्यातील २ कोटी महिलांची आरोग्य तपासणी होणार असून यामध्ये रक्त तपासण्या, हिमोग्लोबिन, मधुमेह, रक्तदाब, आवश्यकतेनुसार सर्व तपासण्या निदान व उपचार करण्यात येणार आहे. राज्यात ८ ठिकाणी अकोला, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर, ठाणे, नागपूर, नाशिक आणि पुणे येथे कॅन्सर व्हॅन लोकार्पण सोहळा होणार आहे. या वाहनांमध्ये कर्करोग प्रतिबंधात्मक (झॲर्शींशिपींळींश जपलेश्रेसू) समुपदेशन, निदान व बायोप्सी या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. हे वाहन ज्या ठिकाणी जाणार आहे त्या ठिकाणी कर्करोगासंबधी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ यांच्या स्तरावर कर्करोग वाहनाचा दौरा कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे.ङ

नव्याने खरेदी केलेल्या ७ अङङ ॲडव्हान्स लाईप सपोर्ट रुग्णवाहिका सद्य:स्थितीत आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या गडचिरोली-उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा, चंद्रपूर-उपजिल्हा रुग्णालय, वरोरा, सिंधुदुर्ग-उपजिल्हा रुग्णालय कणकवळी, पुणे-उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर, रत्नागिरी-प्राथमिक आरोग्य केंद्र, मालगुंड, रायगड-ग्रामीण रुग्णालय महाड या ठिकाणी देण्यात येणार आहेत.ङ

सद्य:स्थितीत अकोला, नाशिक, अम रावती, सातारा, पुणे गडचिरोली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व बीड या ९

जिल्ह्यांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर (किमोथेरपी युनिट) ची स्थापना झालेली आहे.ङ

राज्यात ठाणे सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व वर्धा या ६ जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोग उपचारासाठी किमोथेरपीची सुविधा नव्याने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कॅन्सर डे केअर किमोथेरपी सेंटर अंतर्गत प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारीका यांच्यामार्फत कॅन्सर रुग्णांना उत्कृष्ट दर्जाची किमोथेरपी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.ङ

उपजिल्हा रुग्णालय वैजापूर, छत्रपती संभाजीनगर व उपजिल्हा रुग्णालय डहाणू, जि.पालघर येथील सार्वजनिक खाजगी भागिदारीतून नव्याने कार्यान्वित करण्यात येणाऱ्या सीटी स्कॅन सुविधांचे लोकार्पण आज करण्यात आले.ङ

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत शोधलेल्या संशयित क्षयरुग्णांच्या छातीचा एक्स-रे काढण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून राज्यातील ३४ ग्राम ीण जिल्हे, २२ महानगरपालिका व मुंबईच्या २४ वार्डासाठी राज्यस्तरावरुन आलेल्या ८० डिजिटल पोर्टेबल हँड एक्स-रे मशीनचे लोकार्पण आज करण्यात आले.

राज्यामध्ये १०२ योजनेंतर्गत गरोदर माता व नवजात शिशुंना रुग्णालयात संदर्भित करण्यासाठी ३८४ नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

# अहिल्यानगर ते पोखरी बस सेवा पुन्हा सुरू

## ग्रामस्थांनी केले खा. निलेश लंके यांच्याप्रती ऋण व्यक्त

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.९, पारनेर (अहिल्यानगर) :** खासदार निलेश लंके यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या अहिल्यानगर विभागीय नियंत्रकांना नगर ते पोखरी बस सेवा सुरु करण्यासंदर्भात पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या पत्राची दखल घेऊन नगर ते पोखरी बस सेवा सुरु करण्यात आली असून ही सेवा सुरू झाल्याने पोखरी व परिसरातील ग्रामस्थांनी खा. निलेश लंके यांच्याप्रती ऋण व्यक्त केले आहे. नगर ते पोखरी ही बस सेवा अनेक वर्षे सुरू होती. त्यामुळे पोखरी व परिसरातील प्रवाशांची मोठी सोय होत होती.

मध्यांतरी ही बस सेवा बंद झाल्याने प्रवाशांचे व शाळेतील विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत होती.पोखरी परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, कामगार वर्गासाठी ही बस सेवा अतिशय सुलभ होती. बस सेवा बंद झाल्याने या भागातील प्रवाशांना प्रवासासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अवैध वहातूकीचा मार्ग नाईलाजाने स्विकारावा लागत आहे. ते टाळण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने नगर ते पोखरी ही बस सेवा सुरु करण्यासंदर्भात नगर विभागाच्या नियंत्रकांना खा. लंके यांनी पत्र दिले होते. खासदार निलेश लंके यांच्या नगर येथील संपर्क कार्यालयातील स्वीय सहाय्यक संतोष हांडे यांनी या प्रकरणी नियंत्रकांकडे पाठपुरावा केला होता.

दरम्यान , बस सेवा सुरु झाल्यामुळे पोखरी व परिसरातील प्रवाशांनी आनंद व्यक्त केला. बसचे पोखरी गावामध्ये आगमन झाल्यानंतर जल्लोषात स्वागत करण्यात आले. पहिल्यांदा बस घेऊन आल्याचे चालक तसेच वाहकाचा यथोचित सन्मान करण्यात येऊन त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही पोखरी व परिसरातील प्रवाशांच्या वतीने देण्यात आली.

# रामेश्वरम येथे तिर्थक्षेत्र स्वच्छता अभियान...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.९, विंचूर (नाशिक) :** रामेश्वर येथे नाशिक जिल्ह्यासह इतर जिल्ह्याम धून या तीर्थक्षेत्र स्वच्छता अभियानात, भक्तीपथ सेवा फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी व भाविक भक्तांनी म ोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

भक्तीपथ सेवा फाऊंडेशनच्या वतीने तिर्थक्षेत्र रामेश्वरम येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानात भक्तीपथ सेवा फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, पुणे, नाशिक, मुंबई, हिंगोली, बारामती, सातारा, जालना, संभाजीनगर येथील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. आणि त्यांनी भक्तीभावाने तिर्थक्षेत्र रामेश्वरम येथील मंदिर परिसर व सुमुद्र किनारा येथील श्रमदान करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

भक्तीपथ फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून देव, देश आणि धर्म यासाठी कार्यरत असून, देश-विदेशात सनातन धर्माचा प्रचार व संतांचे विचार पोहोचवणे, तसेच भक्ती सेवा आणि श्रमदानाच्या माध्यमातून समाजसेवा करणे हा त्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमादरम्यान समुद्रकिनारा आणि परिसर स्वच्छ करण्यात आला, तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री शेषजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम राबवण्यात येतात, अशी माहिती भक्तीपथ सेवा फाऊंडेशन चे उपाध्यक्ष दिपक चव्हाण यांनी दिली. उपक्रमादरम्यान फाऊंडेशनचे अध्यक्ष शेषजी महाराज व फाउंडेशन चे पदाधिकाऱ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा संकल्प केला.ह्या वेळी रामेश्वरम देवस्थान व स्थानिक प्रशासन यानी ह्या उपक्रमाचे कौतुक केले असून, यावेळी भक्तीपथ फाऊंडेशनच्या सर्व सदस्यांना शुभेच्छा ही देण्यात आल्या.

# थोडक्यात

## जलकुंभ उभारणीच्या उद्घाटन समारंभ संपन्न

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**



**दि.०८, सावरकर नगर (ठाणे) :** दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी इंदिरानगर - लोकमान्यनगर परिसरात पाणी पुरवठा करणाऱ्या सावरकरनगर- ज्ञानोदयशाळा येथील ५० वर्षे जुन्या जलकुंभाची दुरवस्था व भविष्यातील होणाऱ्या क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेंतर्गत वाढणारी लोकसंख्या पाहता केंद्र सरकारच्या अमृतजल योजनेअंतर्गत रू.३०० कोटी ची तरतूद करून परिसरासाठी ५० एम.एल.डी पाणी क्षमतेपेक्षा पिण्याच्या पाण्याची तहान व वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून इंदिरानगर - ज्ञानोदयशाळा येथील २७.५ एम.एल.डी पाणी क्षमता असणाऱ्या जुन्या जलकुंभाचे पुनर्वसन तसेच त्यापूर्वी अधिक एक २७.५० एम.एल.डी पाणी साठविण्याची क्षमता असणारा अजून एक जलकुंभ उभारणीच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी उपस्थित लोकसभा खासदार नरेश म्हस्के यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. त्यावेळी उपस्थित ज्येष्ठ नगसेवक व माजी विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे, राम रेपाळे, एकनाथ भोईर, दिलीप बारटक्के समवेत सहकारी राधाबाई जाधवर, वनिता घोगरे, कांचन चिंदरकर, आशा डोंगरे, प्राजक्ता खाडे, माजी नगरसेवक व प्रमुख सहकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

## सुपा अतिक्रमण हटाव मोहिमेला मुहूर्त सापडेना - माहिती सेवा समिती पारनेर

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०९, सुपा (अ.नगर) :** संपुर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील अतिक्रमण हटवण्यासाठी जिल्ह्याचे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटिल यांनी निर्णय घेऊन तातडीने अतिक्रमणे हाटवण्या बाबतच्या सूचना केल्या. अतिक्रमणे हाटवण्यासाठी संबंधित अधिकारी वर्गाला तातडीच्या सूचना दिल्यातरी सुपा आणि पंचक्रोशीतील सुपा औद्योगिक वसाहतीतील, सुपा बस स्थानका लगतची अतिक्रमणे जैसे थे च आहेत. अधिकारी वर्ग पुर्विच्या च विचारांच्या दावणीला बांधलेले असल्यामुळे कार्यवाहीला उशीर होत आहे. सुपा आणि परिसरातील वास्तव परिस्थिती पाहता चार मुजोर,धनदांडगे हुकुमशाही गाजवणारे लोकांचीच अतिक्रमण मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. ही वस्तुस्थिति आहे. ह्या धनदांडग्या लोकांची पक्की घरे, दुकाने, गाळे काढण्यासाठी अतिक्रमणे हटाव मोहीम काय पवित्रा घेते. याकडे सर्व सामान्य जनतेचे लक्ष लागले आहे. सुपा -पारनेर रोड लगतीची अतिक्रमणे जास्त दिसून येतात. सुपा लगत राज्यमहामार्गावरील अतिक्रमणे ही काही ठिकाणी सिमेंट काँक्रीटची पक्की घरे, दुकाने, गाळे आहेत. सुपा बस स्थानकाजवळील अतिक्रमणे ही कित्येक वेळा भुईसपाट झाली आणि काही दिवसात जैसे थे!झाली. अतिक्रमण हटाव मोहिमेने पक्के अनधिकृत अतिक्रमणे काढावे, फक्त गोरगरीबांचे अतिक्रमणे काढुन गरीबांवर अन्याय करु नये. तसेच धनदांडग्या, मोठ्या व्यापार्यांना पाठीशी घालू नये, अशी मागणी सर्व सामान्यांकडुन होत आहे.

## फ्रेंडस् फॉरेव्हर फाऊंडेशनच्या वतीने १ ते ४ मार्च ला कृषी महोत्सव

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०९, कळंब (धाराशिव) :** कळंब येथील फ्रेंडस् फॉरेव्हर फाऊंडेशनच्या वतीने १ ते ४ मार्च २०२५ या कालावधीत कृषी महोत्सव, किसान मित्र कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे कृषी प्रदर्शन कळंब शहरातील तालुका क्रीडा संकुल मैदान येथे होणार आहे. या कृषी महोत्सवात १२० स्टॉल, डॉग शो, अश्व प्रदर्शन आणि विविध कंपन्यांचा सहभाग असणार आहे. कृषी प्रदर्शन आयोजना विषयी जय भवानी मंगल कार्यालय परळी रोड येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी कृषी महोत्सव विषयी माहिती देण्यात आली. कृषी तंत्रज्ञान, ऑटो, डॉग शो, अश्वप्रदर्शन, गाय, बैल प्रदर्शन, फूड फेस्टिवल, इलेक्ट्रॉनिक्स व फर्निचर, महिला बचत गट, गृहपयोगी वस्तूंचे प्रदर्शन व विक्री आदी प्रदर्शनाचे विषय आहेत. यासाठी एकूण स्टॉल ११९ असतील. यासाठी भाडे दर निश्चित करण्यात आला आहे. कार्यक्रमासाठी ऑटोमोबाईल्स अवजारे, डाव्या बाजूस डॉग शो, कॅट शो व अश्वप्रदर्शन या प्रदर्शनात ठिबक कंपनी, पशु आहार कंपनी, ट्रॅक्टर कंपनी, क-टिक नाशके कंपनी, जैविक खते कंपनी, जैविक बी बियाणे कंपनी, शेती अवजारे कंपनी, सोलार कंपनी व बँका यांचा सहभाग

आहे. या कृषी प्रदर्शनाची जोरदार तयारी सुरू असून प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सहभाग व सहकार्य करावे, असे संयोजन समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद प्रसंगी डॉ.अभिजीत लोंढे, राहुल कवडे, डॉ.गिरीष कुलकर्णी, उदयचंद्र खंडागळे, गोपाळ उबाळे, परमेश्वर मोरे, दिनेश अष्टेकर, प्राचार्य जगदीश गवळी, मकरंद पाटील यांची उपस्थिती होती.

## मद्य धोरणामुळेच केजरीवालांना जनतेने नाकारले - अण्णा हजारे

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.९, अहिल्यानगर :** दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाने २६ वर्षांपेक्षा जास्त कालावधीनंतर सत्ता प्राप्त केली. या पक्षाने आम आदमी पार्टीचा दणदणीत पराभव केला. कधीकाळी अरविंद केजरीवाल यांचे गुरू राहिलेले जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपच्या पराभवावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. हा पक्ष मद्यधोरणात बुडाला, या पक्षाचे केवळ पैशांवर लक्ष होते,असे अण्णा हजारे म्हणाले. उमेदवाराचे चारित्र्य स्वच्छ असले पाहिजे आणि त्याला त्यागाचे गुण माहीत असले पाहिजे,असा घणाघात अण्णा हजारे यांनी केजरीवालांवर केला. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्यातून जन्मलेला आम आदमी पार्टीचा भाजपाने दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत दारुण पराभव केला. मद्यधोरणाच्या मुद्यात पैसा आला, त्यावेळी केजरीवालांचा पक्ष त्यात बुडाला आणि पक्षाची प्रतिमा खराब झाली. अरविंद केजरीवाल यांच्या स्वच्छ चारित्र्याबद्दल लोक बोलायचे,आता ते मद्यधोरणाबद्दल बोलतात,असे अण्णा हजारे यांनी राळेगण सिद्धी येथे पत्रकारांसोबत चर्चा करताना सांगितले. नि: स्वार्थपणे लोकांची सेवा करण्याची गरज आम आदमी ने समजून घेतली नाही,या पक्षाने चुकीचा मार्ग धरला. पैशाने आघाडी घेतली, त्यामुळे त्यांचा पराभव झाला,असे अण्णा हजारे यांनी म्हटले.